MHLA170006332025

| | |
|---|---|
| दाखल दिनांक - | ११/११/२०२५ |
| नोंदणी दिनांक - | ११/११/२०२५ |
| निकाल दिनांक - | ०९/०६/२०२६ |
| कालावधी - | वर्षे महिने दिवस |
| | ०० ०६ २९ |

**<u>औसा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात.</u>**

(पिठासीन अधिकारी: पी. आय. मोकाशी )

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १९/२०२५**

**निशाणी क्रं.२४.**

१. स्मिता राकेश पाटील,
वय – ४५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. समता नगर, औसा, ता. औसा, जि. लातूर.

२. शुभांगी दगडुपंत जोशी,
वय – ४५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. औसा, ता. औसा, जि. लातूर.

३. रोहिनी दगडुपंत जोशी,
वय – ४१ वर्षे, धंदा - नौकरी,
रा. औसा, ता. औसा, जि. लातूर.

४. प्रसाद दगडुपंत जोशी,
वय – ३९ वर्षे, धंदा - नौकरी,
रा. समता नगर, औसा, ता. औसा, जि. लातूर.

----- **अर्जदार.**

**विरुध्द**

पुजा दगडोपंत जोशी ऊर्फ पार्वती तुकाराम पतंगे,
वय – ५० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. समता नगर, औसा, ता. औसा, जि. लातूर. ----- **उजरदार.**

**उपस्थिती** –

अर्जदारांतर्फे विधिज्ञ श्री. एम. के. शिवणकर.
उजरदारतर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. राठोड.

***न्या य नि र्ण य***

( दिनांक ०९ जुन, २०२६ )

अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणे करीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, ते मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे अपत्य आहेत. मंगल दगडुपंत जोशी यांचा मृत्यू २५/०१/२०१६ रोजी समता नगर, औसा, ता.औसा, जि. लातूर येथे झाला. त्यांच्या पश्चात अर्जदार त्यांचे वारस आहेत. अर्जदारांना मयत मंगल दगडुपंत जोशी यांच्या नावावर असलेले घर त्यांच्या नावाने करण्याकरिता व इतर शासकीय, निमशासकीय योजनेचे लाभ घेण्यासाठी सदर वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, अर्जदारांनी सदरचा अर्ज मंजुर करून अर्जदार हे मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विंनती केली आहे.

३. उजरदार पुजा दगडोपंत जोशी ऊर्फ पार्वती तुकाराम पतंगे यांनी सदर अर्जास आक्षेप घेऊन त्यांचे म्हणणे (नि.क्र.२०) वर दाखल केले आहे. उजरदाराचे असे कथन आहे की, अर्जदारांनी मयत दगडोपंत जोशी यांच्या मृत्यूपश्चात मयत दगडोपंत जोशी यांचे वारस म्हणून अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सि.एम.ए.नं. ४३५/२०२३ हा मे. न्यायालयात दाखल केला असून सदर अर्जामध्ये अर्जदारांनी खोटी माहिती सादर करुन मे. न्यायालयाची दिशाभुल करुन बेकायदेशीररित्या मे. न्यायालयात वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांनी सदरच्या वारस प्रमाणपत्र मिळणे बाबतच्या अर्जाव्यतिरिक्त मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर औसा यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे करीता सि.एम.ए.नं. ४३७/२०२३ हा अर्ज दाखल केला असून सदरची बाब ही या मे. न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे व सदर सि.एम.ए.नं. ४३५/२०२३ दाखल असले बाबतची बाब मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर औसा या न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. अशा प्रकारे अर्जदारांनी मे. न्यायालयाची दिशाभुल करुन फौजदारी स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्जदारांचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा.

४. त्यांचे पुढे असे कथन आहे की, मयत दगडोपंत जोशी यांनी दोन विवाह केले असून उजरदार ही मयत दगडोपंत जोशी यांची दुसरी पत्नी आहे. मयत

दगडोपंत जोशी यांनी त्यांच्या पहिल्या पत्नीच्या मृत्यूपश्चात उजरदार हिचे सोबत दुसरा कायदेशीर विवाह केला आहे. त्यामुळे उजरदार ही मयत दगडोपंत जोशी यांची वारस आहे. तसेच मयत दगडोपंत जोशी यांना त्यांचे पहिली पत्नी पासून अर्जदार क्र. १ ते ३ या मुली व अर्जदार क्र. ४ मुलगा असे अपत्य आहेत. मयत दगडोपंत जोशी यांचे पहिल्या पत्नीचे मृत्यूनंतर दगडोपंत जोशी यांना मधुमेह, उच्च रक्तदाब अशा आजारांची लागण होती. त्या दरम्यान अर्जदार क्र. १ ते ४ यांनी त्यांची कसलीही देखभाल केलेली नाही. तसेच देखभाल करण्यास नकार दिल्यामुळे मयत दगडोपंत जोशी यांनी दुसरा विवाह उजरदार श्रीमती पुजा दगडोपंत जोशी यांच्याशी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे साक्षीदार आणि पुरोहिता समक्ष विवाह केला व त्यानुसार उजरदारास पत्नी म्हणून स्विकार केलेला होता.

५. त्यांचे पुढे असे कथन आहे की, तद्नंतर उजरदार व मयत दगडोपंत जोशी हे औसा येथील त्यांचे राहते घरी गुण्यागोविंदाने संसार करु लागले. त्या दरम्यान अर्जदार क्र. १ ते ४ यांनी उजरदार यांना केंव्हाही आई म्हणून मानपान दिलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ४ हे उन्हाळा किंवा दिवाळी सुट्टयांमध्ये औसा येथील घरी आल्यानंतर उजरदारास निकृष्ट दर्जाची वागणूक देत असत तसेच मयत दगडोपंत जोशी यांनाही घालुन पाडून बोलुन भांडण तक्रारी करत असत. मयत दगडोपंत जोशी यांच्या मृत्यूपुर्वी अर्जदार क्र. १ ते ४ यांनी केंव्हाही त्यांना वडील

म्हणुन वागणुक दिलेली नाही. मयत दगडोपंत जोशी यांच्या मृत्यूपूर्वी अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत दगडोपंत जोशी यांच्याशी भांडण तक्रारी करत असल्यामुळे मयत दगडोपंत जोशी यांनी अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या विरोधात पोलीस स्टेशन औसा येथे तक्रारीही दिलेल्या होत्या. त्यानंतर अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मयत दगडोपंत जोशी यांची देखभाल करणे व बोलणेही बंद केले.

६. त्यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जामध्ये उल्लेखीत घरजागा ही मयत दगडोपंत जोशी यांनी उजरदार यांच्या नावे दुय्यम निबंधक कार्यालय औसा येथे नोंदणीकृत मृत्यूपत्र आधारे हस्तांतरीत केलेली आहे. ज्याचा नोंदणीकृत दस्त क्र. ४२३९/२०२१ असा आहे. त्यामुळे अर्जदारांचा सदर घरजागेवर कसल्याही प्रकारे हक्क संबंध राहिलेला नाही. परंतु अर्जदारांनी सदर बाबीचे ज्ञान असूनही खोटया पध्दतीने मे. न्यायालयाची दिशाभुल करुन सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करणे न्यायोचित आहे.

७. त्यांचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्र. १ ते ४ यांनी उजरदार ही मयत दगडोपंत जोशी यांची पत्नी व अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई असतांनाही त्यांना वगळून खोटया पध्दतीने कोर्टाची दिशाभुल करुन दाखल केलेला आहे. वास्तविक पाहता उजरदार या मयत दगडोपंत जोशी यांच्या कायदेशीर

वारस आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी दाखल केलेला अर्ज रद्द नाही झाल्यास उजरदार यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. तसेच सदर वारस प्रमाणपत्राचा आधार घेवून अर्जदार क्र. १ ते ४ हे उजरदार यांच्या मालकी ताब्यातील घर मिळकतीवर बेकायदेशीररित्या स्वतःचे नाव लावून घेवून उजरदार हीस सदर मिळकतीतून बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ यांचा अर्ज खर्चासह खारीज करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

८. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारांच्या कथनावरुन आणि उजरदाराने घेतलेल्या आक्षेपावरून खालील मुद्दे माझे विचारार्थ घेतले असून त्याचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतात काय की, ते मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे कायदेशीर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत ? | होय. |
| २. | उजरदार हे सिध्द करते काय की, ती मयत मंगल दगडुपंत जोशी यांची कायदेशीर वारस आहे ? | नाही. |
| ३. | आदेश व हुकूमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## *कारणमिमांसा*

९. अर्जदारांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ नि.क्र. ४ लगत अ.क्र. १ वर मंगल दगडुपंत जोशी यांचे मृत्यू प्रमाणपत्र, अ.क्र. २ ते ५ वर अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधारकार्डच्या प्रती, नि.क्र. १८ वर दि.१३/०७/२०२३ रोजीचे दैनिक विश्वउदय वर्तमानपत्र इ. कागदपत्रे दाखल केले आहेत.

अर्जदारांनी त्यांच्या मार्फत अर्जदार क्र. १ स्मिता राकेश पटेल यांचे सरतपासणीचे शपथपत्र नि.क्र. १९ वर दाखल केले आहे. अर्जदारांनी त्यांचा पुरावा संपल्याबाबतची पुरसिस नि.क्र.२३ वर दाखल केली आहे.

१०. उजरदाराने नि.क्र. २२ लगत अ.क्र. १ वर मृत्यपत्राची प्रत, अ.क्र. २ वर विवाह संपन्न झालेबाबतचे चार फोटो, अ.क्र. ३ वर रहिवाशी प्रमाणपत्र आणि अ.क्र. ४ वर त्यांच्या आधारकार्डची प्रत दाखल केली आहे. उजरदारास संधी देऊनही त्यांनी आपला तोंडी अथवा लेखी पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे नि.क्र. १ वरील आदेशाप्रमाणे त्यांचा पुरावा बंद करण्यात आला.

११. अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार क्र. १ ते ४ हे नात्याने मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे अपत्य आहेत. अर्जदारांना मयत मंगल दगडुपंत जोशी यांच्या नावावर असलेले घर त्यांच्या नावाने

करण्याकरिता व शासकीय, निमशासकीय योजनेचे लाभ घेण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. कायदयानुसार अर्जदार हे मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत. उजरदाराचा मयत मंगल दगडुपंत जोशी यांच्याशी काहीएक हक्क संबंध नाही. केवळ अर्जदारांना त्रास देण्याकरिता उजरदाराने उजरदारी दाखल केलेली आहे. सबब, अर्जदारांच्या विधीज्ञांनी अर्ज मंजुर करून अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

१२. उजरदार व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. सबब, उजरदारातर्फे युक्तिवाद नाही.

**<u>मुद्दा क्र. १ व २ करिता:–</u>**

१३. अर्जदारांनी अर्जाच्या शाबिती कामी अर्जदार क्र. १ स्मिता पाटील यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१९ वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जातील कथनांची तंतोतंत पुनरावृत्ती केली आहे. उजरदाराने अर्जदाराचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे नि.क्र.१९ वर उलटतपास नाही चा आदेश पारित करण्यात आला. उजरदाराने अर्जदाराचा उलटतपास न घेतल्यामुळे अर्जदारांचा पुरावा अबाधित राहिलेला आहे व तो जसाच्या तसा स्वीकारणे गरजेचे आहे.

१४. सदरचा अर्ज अर्जदारांनी ते मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

अभिलेखावरिल नि.क्र. ४ लगत दाखल असलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मंगल दगडुपंत जोशी या दि. २५/०१/२०१६ रोजी मयत झाल्या.

१५. उजरदाराचे असे म्हणणे आहे की, दगडुपंत जोशी यांनी त्यांच्या पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांच्याशी साक्षीदार व पुरोहितासमक्ष दुसरा विवाह केलेला आहे. त्यामुळे ती मयत दगडुपंत जोशी यांची कायदेशीर वारस आहे. तसेच मृत्यूपत्र दस्त क्र. ४२३९/२०२१ नुसार ती मयत दगडुपंत जोशी यांचे मालकी कब्जेची घर जागा नगर परिषद जुना मालमत्ता क्रमांक ७–२०२९ व नविन मालमत्ता क्रमांक W ७/Z ४/IR/०००४६९, सिटीएस नं.१९६३ ची हक्कदार आहे. परंतू, उजरदाराने सदर मृत्यूपत्र हे नोटरी किंवा मृत्यूपत्रावर असलेले दोन्ही साक्षीदार यांना तपासून शाबित केलेले नाही. तसेच उजरदाराने मुळ मृत्यूपत्र अभिलेखावर न दाखल करता त्याची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदर मृत्यूपत्राची छायांकित प्रत ही दुय्यम पुरावा म्हणुन ग्राहय धरावी याकरिता अर्ज देखील अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे उजरदाराने दाखल केलेले मृत्यूपत्राची छायांकित प्रत पुराव्याकामी ग्राहय धरता येत नाही. तसेच उजरदाराने त्यांच्या विवाहाचे फोटो अभिलेखावर दाखल केलेले आहेत. परंतू, फोटो पुरावा म्हणुन ग्राहय धरता येणार नाही. सबब, सदर मृत्यूपत्राअधारे उजरदार ही सदर मिळकतीची हक्कदार आहे असे सिध्द होत नाही.

१६. उजरदाराने ती मयत दगडुपंत जोशी यांची कायदेशीर पत्नी असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

त्यामुळे ती मयत दगडुपंत जोशी यांची कायदेशीर वारस आहे असे सिध्द होत नाही. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे अपत्य या नात्याने कायदेशीर वारस असल्याचे निर्विवाद सिध्द होते. म्हणुन, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ३ करिता:–**

१७. मुद्दा क्र. ३ करीता उपरोक्त निष्कर्षानुसार अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त आहे. अर्जदारांनी सिध्द केले आहे की, ते मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब, मुद्दा क्र. ३ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

***आ दे श***

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. याद्वारे असे घोषित करण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत मंगल दगडुपंत जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत.

३. नियमांनुसार आवश्यक न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या नावाने वारसा प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.06.10 17:17:21 +0530

दिनांक ०९/०६/२०२६ ( पी. आय. मोकाशी )

ठिकाणः– औसा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, औसा.